23 NOV 2024 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सरावामध्ये सातत्य ठेवा : कुलगुरू डॉ. शिर्के

## शिवाजी विद्यापीठात क्रॉस कंट्री विजयी खेळाडूंचा सत्कार

कोल्हापूर : प्रतिनिधी

खेळाडूंनी सरावामध्ये सातत्य ठेवणे आवश्यक आहे. नियोजनबद्धता आणि शिस्त राखत येणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपसाठी तयारी करावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. राष्ट्रीय क्रॉसकंट्री पदक प्राप्त खेळाडूंचा सत्कार त्यांच्या हस्ते सत्कारप्रसंगीत ते बोलत होते.

मेंगलोर विद्यापीठ यांच्यामार्फत आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रॉसकंट्री पुरुष स्पर्धेमध्ये देशभरातून २४७ विद्यापीठांचे पुरुष संघ सहभागी झालेले होते. शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष संघाने




राष्ट्रीय क्रॉसकंट्री पदकप्राप्त खेळाडूंचा सत्कार करताना कुलगुरू शिर्के व इतर.

उल्लेखनीय कामगिरी केली. प्रधान किरूळकर याने वैयक्तिक द्वितीय क्रमांक व अभिषेक देवकाते याने वैयक्तिक तृतीय क्रमांक पटकावला. शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष संघाने ८९ गुणांची कमाई करत सांघिक चतुर्थ क्रमांक मिळवला. या संघामध्ये प्रधान किरूळकर, अभिषेक देवकाते, प्रवीण कांबळे, उत्तम पाटील, अंकुश हाक्के, राहुल चव्हाण यांचा समावेश होता. तसेच महिलांच्या स्पर्धेमध्ये देशभरातून १०७ विद्यापीठांचे महिला संघ सहभागी झाले होते. शिवाजी विद्यापीठाच्या महिला संघाने या स्पर्धेवर वर्चस्व ठेवले. सृष्टी रेडेकर हिने वैयक्तिक पाचवा क्रमांक पटकावला. तर महिलांच्या संघाने ६४ गुणांसह सांघिक तृतीय क्रमांक पटकावला. या संघामध्ये सृष्टी रेडेकर, वैष्णवी मोरे, वैष्णवी रावळ, गायत्री पाटील, वैष्णवी सावंत, सानिका नलवडे यांचा समावेश होता.

याप्रसंगी प्रकुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा विभागप्रमुख डॉ. एस. व्ही. बनसोडे, प्रशिक्षक प्रा. रामा पाटील, प्रशिक्षक प्रा. प्रकुल पाटील मांगोरे व संघ व्यवस्थापक डॉ. सविता भोसले, प्रा. सुचय खोपडे हे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 NOV 2024
सकाळ



वारणानगर : येथील वारणा महाविद्यालयाच्या ज्यूदो स्पर्धेतील खेळाडू शुभम कोळी, पायल पाटील यांचा सत्कार करताना मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विलास कार्जिन्नी, जिमखानाप्रमुख प्रा. क्रांतिकुमार पाटील आदी.

# पश्चिम विभागीय ज्यूदो स्पर्धेसाठी 'वारणा'च्या शुभम कोळीची निवड

वारणानगर, ता. २२ : यशवंतराव चव्हाण कॉलेज कोल्हापूर यांच्यावतीने शिवाजी विद्यापीठात आयोजित केलेल्या आंतरविभागीय ज्यूदो स्पर्धेत वारणानगर येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयाच्या शुभम शिवाजी कोळी याने सुवर्णपदक पटकाविले. त्याची भोपाळ येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

शिवाजी विद्यापीठात झालेल्या ज्युदो स्पर्धेत वारणा महाविद्यालयाचे पाच खेळाडू सहभागी झाले होते. ८१ किलो वजनी गटात अंतिम सामन्यात नाईट कॉलेजच्या प्रदीप अणुसे याच्यावर मात करून वारणाच्या शुभमने सुवर्णपदक पटकावले. त्याची भोपाळ येथे होणाऱ्या स्पर्धेसाठी निवड झाली. पायल महेश पाटील हिने ५२ किलो गटात ब्राँझपदक पटकावले.

विजयी खेळाडूंना वारणा विभाग शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. विनय कोरे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विलास कार्जिन्नी, प्राचार्य डॉ. ए. एम. शेख यांचे प्रोत्साहन व जिमखानाप्रमुख प्रा. क्रांतिकुमार पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.